मला वाचायला आवडतं



# घे भरारी!

गीता धर्मराजन

कथाचे ३००एम थिंकबुक



एकदा एक लहान
मुलगी होती. तिचं नाव होत

# सुनी पंड्या

सुनीचं एक मोठ्ठं स्वप्न होतं.
तिला उडायची इच्छा होती!
आपलं स्वप्न खरं करण्यासाठी तिनं
खूप प्रयत्न केले.



आणि एके दिवशी...
ती उडत उडत ती चक्क
अवकाशात गेली!



जेव्हा तिचं अवकाशयान
बिघडायचं तेव्हा ती स्वतःच ते
दुरुस्त करायची



सुनी ढगातून जायची.
अवकाशयान एकट्याने चालवायचं
म्हणजे खूप कष्टाचं काम होतं!



सुनी अवकाशयानाच्या आत
व्यायाम करायची!





सुनी तब्बल १९५ दिवस अवकाशात होती! अवकाशयानातच ती खायची, झोपायची आणि वाचत बसायची!

सुनी एकदम धाडसी होती. तुमच्यासारखीच!

एके दिवशी कदाचित तुम्हीसुद्धा
तिच्यासारखी उंच झेप घ्याल!





# वर बघा!

दिवसा आकाशात लख्ख प्रकाश
असतो आणि ढग असतात


रात्री आकाशात अगणित तारे आणि
चंद्र दिसतो.

जेव्हा शास्त्रज्ञ आकाशाबद्दल बोलतात तेव्हा
ते त्याला अवकाश म्हणजेच स्पेस म्हणतात

शास्त्रज्ञांना अनेक वर्ष प्रश्न पडला होता की,
स्पेस नक्की कशाने तयार झालं आहे.

कदाचित तुम्ही मोठे होऊन शास्त्रज्ञ व्हाल
आणि अवकाशाचे रहस्य उलगडाल!

खालची चित्रं पाहा. प्रत्येक चित्र या पुस्तकाच्या कोणत्या पानावर आहे
त्याच्या जोड्या जुळवा आणि ते चित्र रंगवा!





# मी आहे पृथ्वी!

पृथ्वीचा हा फोटो अवकाशातून काढलेला आहे.

तुम्हाला या फोटोमध्ये भारत दिसत आहे का?



## विचार करा

मोठं झाल्यावर काय व्हायचं तुमचं स्वप्न आहे?

## विचारा

तुमचं स्वप्न खरं करण्यासाठी तुम्ही काय करत आहात?





## चर्चा करा

तुमची स्वप्नं खरी करण्यासाठी कोणते गुण आवश्यक आहेत?

☐ कष्ट ☐ शिक्षण ☐ साहस


☐ ज्ञान ☐ भीती





## कृती करा

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आपली स्वप्नं खरी करणाऱ्या पाच स्त्रियांची यादी करा. त्यांच्याबद्दल जास्तीत जास्त माहिती वाचा.



## ३-२-१ आणि भुर्ररररर!

तुम्ही आता अवकाशात झेप घ्यायला सज्ज आहात. अवकाशयान तुमची वाट पाहत आहे. अवकाशात जाताना तुम्ही कोणत्या पाच गोष्टी सोबत घ्याल आणि का?

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _

_ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _ _



# मी आहे
# तुमची मैत्रिण, पृथ्वी!

शास्त्रज्ञ म्हणतात की आकाशात अगणित तारे आहेत!
पण ते पाहण्यासाठी तुम्हाला टेलिस्कोपची गरज असेल!

गीता धर्मराजन या तामिळनाडूतील तंजावर जिल्ह्यातील आहेत. त्या बालसाहित्यकार आहे. त्यांनी १९८८ साली कथाची स्थापना केली. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्यासाठी त्यांना पद्मश्रीसह अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

छायाचित्रे : विकिमीडिया कॉमन्स

## KATHA

कथा ही जागतिक पातळीवरील मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्था (www.katha.org) आहे. ही संस्था १९८८ सालापासून साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंत विविध क्षेत्रांत अविरतपणे काम करत आहे. प्रकाशन आणि गरीब मुलांच्या शिक्षणासाठी काम करण्याचा आमचा सुमारे ३० वर्षांचा अनुभव आहे.

"भारताच्या शिरपेचातील शैक्षणिक हिरा." **- नाओयुकी शिनोहारा, व्यवस्थापकीय उपसंचालक, आयएमएफ**

"कथा हा जगभरातील कल्पक प्रकल्पांसाठी एक आदर्श उदाहरण आहे, जो शहरातील सामान्य व नाट्यमय व्यथांना टिपतो." **- चार्ल्स लँड्री, द आर्ट ऑफ सिटी मेकिंग**

"कथाला मुलांबद्दल ममत्व आहे. म्हणूनच ही संस्था मुलांसाठी इतकी सुंदर पिक्चर बुक्स म्हणजेच चित्रपुस्तके तयार करते" **- टाइम आउट**

"मुले ही कथाच्या पुस्तकांमध्ये जसा बदल घडवतात तसा त्यांच्या समुदायामध्ये शाश्वत आणि प्रत्यक्ष बदल घडवू शकतात, या संकल्पनेवर कथाचे काम आधारलेले आहे" **- पेपरटायगर्स**


प्रथम आवृत्ती वर्ष २०२१


कॉपीराइट © कथा, २०२१
मजकूराचा कॉपीराइट © गीता धर्मराजन
छायाचित्रे कॉपीराइट © विकिमीडिया कॉमन्स


ए३, सर्वोदय एन्क्लेव्ह, श्री अरबिंदो मार्ग, नवी दिल्ली ११००१७
फोन: ९१-११ ४१४१ ६६००. ४१४१ ६६१०
ई-मेल: editors@katha.org, Website: www.katha.org
ISBN 978-93-82454-65-6


**आमचे मिशन :** प्रत्येक मूल उत्तम वाचेल आणि मजेसाठी वाचेल!

कथा ही नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था असून ही संस्था १९८८ साली सुरू झाली. आम्ही साक्षरतेपासून ते साहित्यापर्यंतच्या क्षेत्रात अविरत काम करत आहोत. मुलांमध्ये आणि प्रौढांमध्ये वाचनाची आवड वृद्धिंगत व्हावी यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, आम्ही गरीबीत जगत असलेल्या १,००,००० मुलांसोबत काम करत असून दर्जेदार पुस्तके आणि इतर प्रयत्नांच्या माध्यमातून त्यांना श्रेणी पातळीवर आणण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.


सर्व हक्क आरक्षित. प्रकाशकाच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय या पुस्तकातील कोणताही भाग पुनरुत्पादित केला जाऊ नये किंवा कोणत्याही प्रकारात वापरून नये.


या पुस्तकांच्या विक्रीमधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा १०% भाग वंचित विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी आणि आयुष्यभराच्या अध्ययन कार्यक्रमांना सहाय्य करण्यासाठी देण्यात येतो.





आय लव्ह रीडिंग लायब्ररी ही पुस्तकांची एक वैशिष्ट्यपूर्ण मालिका आहे. या लायब्ररीच्या माध्यमातून नव्या आणि वाचनाबद्दल एक प्रकारचा न्यूनगंड असलेल्या वाचकांना सातत्यपूर्ण वाचनासाठी प्रोत्साहित करण्यात येते. वेगेवगळ्या पातळ्यांवर असलेल्या मुलांच्या अध्ययन गरजांनुसार उत्तम दर्जाचा आणि सुंदर डिझाइन असलेला कंटेन्ट उपलब्ध करून देण्यात येत आहे. या माध्यमातून भारत आणि जगातील उत्तम साहित्यकृती सादर करण्यात येत आहेत. आमच्या पुस्तकांमध्ये गीता धर्मराजन यांचे स्टोरीपेडॅगॉगीTM (कथाअध्ययनशास्त्र) समाविष्ट करण्यात आले आहे, जे विशेषतः पहिल्या पिढीतील वाचकांमध्ये वाचनाच्या आनंदाचा प्रसार करते, आणि मुलांना मोठ्या कल्पना आणि जादुई जगात घेऊन जाते! (विचार करा, विचारा, चर्चा करा, कृती करा आणि साध्य करा).

कथाज होलिस्टिक अर्ली लर्निंग (खेल) प्रयोगशाळेच्या माध्यमातून सरकारी, स्वयंसेवी संस्थांमधील आणि खासगी शाळांमधील शिक्षकांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. या F2F (फेस टू फेस) कार्यशाळा असतात आणि त्यांना ऑनलाइन सत्रांची जोड दिलेली असते. या कार्यशाळेत शिक्षकांना, शाळा प्रशासकांना आणि स्वयंसेवकांना रीडिंग टीचर्स प्रमाणपत्र प्राप्त होते. अधिक माहितीसाठी 300m@katha.org या ईमेलवर संपर्क साधावा.

## ही सर्व आयएलआर पुस्तके

## मनोरंजनात्मक आणि अर्थपूर्ण वाचन करा

































FOR OUR BOOKS

www.books.katha.org

"कथा… भारतीय प्रकाशन इतिहासातील एक खास आणि वैशिष्ट्यपूर्ण चळवळ."
- द आयकॉनिक इकोनॉमिक टाइम्स

## इन द ग्रीन सीरिज

मुलांसाठी
'कथा'चे पुस्तक
ISBN 978-93-88284-81-3
9 789388 284813
www.katha.org
₹ xxx